वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–सोमवार दि. १० नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## रुपाली पाटील ठोंबरे अन् अमोल मिटकरींची राष्ट्रवादीच्या प्रवक्तेपदावरुन हकालपट्टी


# नव्या प्रवक्त्यांची यादी जाहीर!

Email.- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email.-editordivyawarta@gmail.com





राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

जावक क्र.: 1320

खा. सुनिल तटकरे
प्रदेशाध्यक्ष

दि. १०/११/२०२५

नमस्कार,

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून खालीलप्रमाणे प्रवक्ते म्हणून नव्याने नियुक्त्या करण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| मा. आ. श्री. अनिल पाटील | श्रीमती रुपाली चाकणकर | श्री. ब्रिजमोहन श्रीवास्तव |
| मा. आ. श्री. चेतन तुपे | श्री. आनंद परांजपे | श्री. अविनाश आदिक |
| मा. आ. श्रीमती सना मलिक | श्रीमती राजलक्ष्मी भोसले | श्री. सुरज चव्हाण |
| श्रीमती हेमलता पाटील | श्रीमती प्रतिभा शिंदे | श्री. विकास पासलकर |
| श्री. राजीव साबळे | श्री. प्रशांत पवार | श्री. श्याम सनेर |
| श्रीमती सायली दळवी | श्री. शशिकांत तरंगे | |

कार्यालयीन चिटणीस - श्री. संजय तटकरे (९८२०२७०५७७)

श्री. आनंद परांजपे (९८२१७१३६५८) हे संपर्कासाठी प्रदेश कार्यालयामध्ये उपलब्ध राहतील.

वरील प्रमाणे केलेल्या नियुक्त्या व्यतिरिक्त यापूर्वी केलेल्या सर्व नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या आहेत.

सुनिल तटकरे

कृपया प्रसिद्धीसाठी;

मुंबई, (दिव्य न्युज):– गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वादग्रस्त वक्तव्यं करुन स्वत:च्या पक्षाची कोंडी करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अमोल मिटकरी आणि रुपाली ठोंबरे–पाटील यांची प्रवक्तेपदावरुन हकालपट्टी करण्यात आली आहे. अमोल मिटकरी यांच्या वक्तव्यांमुळे महायुतीमध्ये सातत्याने तणाव निर्माण होताना दिसत होता. तर रुपाली पाटील ठोंबरे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यावर तिखट आणि शेलक्या भाषेत टीका केली होती.

फलटणमधील डॉक्टर तरुणीच्या आत्महत्याप्रकरणावरुन रुपाली ठोंबरे यांनी आपल्याच पक्षाच्या रुपाली चाकणकर यांना लक्ष्य केले होते. त्यामुळे रुपाली ठोंबरे पाटील यांना कारणे दाखवा नोटीसही पाठवण्यात आली होती. त्यानंतर रुपाली ठोंबरे पाटील यांनी अजित पवार यांचीही भेट घेतली होती. ही भेट होऊन काही तास उलटत नाही तोच रुपाली ठोंबरे पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्तेपदावरुन हकालपट्टी करण्यात आली आहे. याशिवाय, वैशाली नागवडे आणि संजय तटकरे यांना देखील प्रवक्ते पदावरून हटवण्यात आले आहे. तर मध्यंतरी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना मारहाण केल्यामुळे पायउतार व्हावे लागलेल्या सुरज चव्हाण यांची पुन्हा एकदा प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावर अमोल मिटकरी आणि रुपाली ठोंबरे पाटील काय प्रतिक्रिया देतात, हे पाहावे लागेल.

फलटण येथील डॉक्टर तरूणीच्या आत्महत्या प्रकरणांमध्ये चाकणकर यांनी तरुणीचं चारित्र्यहनन केलं असल्याचा आरोप करत रुपाली ठोंबरे यांनी चाकणकर यांच्यावर टीका केली होती. या दोन्हीही पक्षाच्या महिला नेत्यांमध्ये सुरू असलेल्या वादाची दखल राष्ट्रवादी पक्षाकडून घेण्यात आली होती. सदर प्रकरणाबाबत पक्षाचे संघटक सरचिटणीस संजय खोडके रूपाली ठोंबरे यांना ही नोटीस पाठवली होती. या नोटीसमध्ये आपणास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश प्रवक्ते पदाची जबाबदारी दिली असताना आपण राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष व पक्षाच्या महिलाध्यक्षा यांच्याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये केलेले वक्तव्य हे पक्षशिस्त भंग करणारे आहे, म्हणून आपल्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये याचा ७ दिवसांत रुपाली पाटील ठोंबरेंना खुलासा करण्यास सांगितले होते. त्यानंतर आज पक्षाकडून रुपाली पाटील–ठोंबरे यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या प्रवक्तेपदावरुन काढून टाकण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी शेख निजाम यांची नियुक्ती






बीड , (दिव्य न्युज):– राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री माननीय नामदार अजित दादा पवार साहेब, राष्ट्रीय कार्याध्यक्ष श्री प्रफुल्ल भाई पटेल साहेब, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनीलजी तटकरे साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. जलालुद्दीन सय्यद ▶▶ पान २ वर

## प्रभाग क्रमांक २३ मध्ये पत्रकार समीर सरकार ठरणार गेमचेंजर

### प्रभागातील दांडगा जनसंपर्क सर्वसामान्य लोकांशी असलेले थेट नाळ ही भक्कम बाजू

बीड , (दिव्य न्युज):– प्रभाग क्रमांक २३ येथील धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते तथा सतत सामाजिक विषयवार रोखठोक भूमिका घेणारे युवा पत्रकार समीर सरकार यांच्या भूमिकेवर अनेकांचे लक्ष लागून आहे. अतिशय तळागाळातील लोकांच्या समस्या आणि मागण्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देवून त्या साठी न्याय मिळवून देण्यासाठी समीर सरकार यांचा हातखंडा आहे.

प्रभागातील मोमीन पुरा , मोहमदिया कॉलोनी , नमरा कॉलोनी ,लेंडी परिसर , अरीश कॉलोनी ,आमेर कॉलोनी ,मासूम कॉलोनी, मिल्लत नगर, ▶▶ पान २ वर



### स्वच्छ प्रतिमा असल्याने ठरतोय पसंतीस पात्र

समीर सरकार हे नेहमी सामाजिक कार्यात सक्रिय असतात सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत.पत्रकारिता क्षेत्रात असल्याने प्रशासकीय कामाचा प्रशासकीय कार्यालयीन कामाचा त्यांना मोठा अनुभव आहे. नगर पालिकेच्या निवडणुकीत ते सहभागी झाल्यास सहज निवडून येवू शकतात त्याला कारण म्हणजे शेवटच्या घटकापर्यंत असलेला जनसंपर्क चालत बोलत व्यासपीठ असलेला हा तरुण या भागातील अनेक लोकांना आवडीचा आहे कोणत्याही गोष्टीचा गर्व नसून साधा सरळ माणूस म्हणून ते या परिसरात प्रसिद्ध आहेत सोबत उच्च शिक्षित असल्याने ते कोणत्याही पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढले तर अनेकांना हादरा देवू शकतात अशी चर्चा या भागात सुरू आहे

## मोहम्मद असरार यांच्या अभ्यास पूर्ण मुलखतीने निरीक्षक प्रभावित





### सड़ेतोड़ मुलाखतिने असरार यांची दावेदारी पक्की

बीड, (दिव्य न्युज):– नगर परिषद निवडणुकीचे बिगुल वाजले आहे सर्वच पक्षाचे उमेदवार आता कंबर कसून निवडणुकीच्या तयारी ला लागले आहेत.याच दरम्यान काल रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार यांच्या पक्षाच्या वतीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या यात शहरातील दोनशे पेक्षा जास्त उमेदवारानी उमेदवारी साठी मुलाखत दिल्या मात्र या सर्वांत चर्चा आहे फक्त एकाचं मुलाखतीची ती म्हणजे प्रभाग क्रमांक १७ ओबीसी पुरुष प्रवर्गातून राष्ट्रवादी काँग्रेस ▶▶ पान २ वर

### सोबतीला असंख्य समर्थक आणि कार्यकर्ते आणि घोषणांचा गजर हाजी असरार ठरले प्रभावी

अनेक जण मुलाखती साठी उपस्थित राहिले अनेक जणांनी आपल्यालाच उमेदवारी मिळावी या साठी प्रयत्न केले मात्र असरार हे पूर्ण तयारीनिशी मुलाखती साठी आले होते याने अनेकांच्या भुवया उंचावल्या सोबत अनेक कार्यकर्ते आणि समर्थक असल्याने आसरार यांचे पारडे जड दिसते त्यासह त्यांची अभ्यासपूर्ण मांडणी आणि प्रभागातील मतदारांचे गणित त्यांनी अतिशय नियोजनबध्द रीत्या मांडले असल्याने त्यांची मुलाखत गाजली आहे त्यांच्या मुलाखतीचे आणि अहवालाचे खुद्द निरीक्षकांनी कौतुक केले प्रभागातील किती मते आपल्या पारड्यात आहेत पक्षाच्या माध्यमातून प्रभागात कोणती विकासाची कामे झाले व सर्व जातीय गणिते त्यांनी अतिशय नियोजनबध्द रीत्या मांडल्याने त्यांच्या उमेदवारीवर एका प्रकारे शिक्कामोर्तब झाले आहे



## मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात चौकशीसाठी नेमलेले अधिकारीच घोटाळ्यात सामील

### सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांचा आरोप

मुंबई ,(दिव्य न्युज):– अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीमार्फत झालेल्या जमीन व्यवहार प्रकरणात अनियमितता आढळल्याप्रकरणी आता चौकशी समिती नेमण्यात आली आहे.तसेच, हा व्यवहार रद्द करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.मात्र, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमलेले अधिकारी हेच या गैरव्यवहारात सामील असल्याने चौकशी प्रक्रिया निष्पक्ष ▶▶ पान २ वर




## नगर परिषद निवडणुकीचा आखाडा तापणार

# आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात, सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी

### आखाड्यात कोण कोण उतरणार, संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष

बीड, (दिव्य न्युज):– राजकीयदृष्ट्या संवेदनशील म्हणून समजल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यात सहा नगरपालिकांसाठी निवडणूक होत असून आज दि. १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. बहुप्रतिक्षेनंतर नगरपालिकेच्या निवडणुका होत आहेत. मात्र राज्यात । गेल्या तीन वर्षांच्या कालखंडात घडलेल्या अनपेक्षित घडामोडीमुळे सत्तेतले पक्ष स्थानिक निवडणुकीत एकमेकांसमोर येत असल्याने गेवराई वगळता अद्याप अन्य पाचही नगरपालिकांसाठी भाजप, अजितदादा राष्ट्रवादी, शरद पवार राष्ट्रवादी, शिवसेनेचे दोन्ही गट आणि काँग्रेसला उमेदवारांची घोषणा करता





आलेली नाही. अद्यापही चाचपणी आणि मनधरणी करण्यात सर्वच पक्ष गुंतले असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे नगरपालिकेच्या या निवडणुकीसाठी केवळ सहा दिवस प्रचारासाठी मिळणार असल्याने उमेदवारांची या निवडणुकीत दमछाक होणार आहे.ङ्गङ्गमहायुतीतील घटक पक्ष असलेले ▶▶ पान २ वर

# क्षीरसागर घराण्यातील आता भाजपातही दोन्ही राष्ट्रवादी आणि भाजपाचा दरबार आता बंगल्या



## विधानसभा निवडणुकीतच त्यांनी आ.संदीप क्षीरसागरांची साथ सोडून योगेश क्षीरसागरांचा प्रचार केला होता



बीड, (दिव्य न्युज):- राज्यातील २४६ नगरपालिका निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यानंतर बीडच्या राजकारणात मोठी हालचाल झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ला धक्का देत आमदार संदीप क्षीरसागर यांचे सख्खे भाऊ हेमंत क्षीरसागर भाजपच्या वाटेवर आहेत.

हेमंत क्षीरसागर यांनी विकासाचा दृष्टिकोन ठेवून भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले आहे. विकासासाठी आणि स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी भाजपा योग्य पर्याय आहे, असे ते म्हणाले. त्यामुळे त्यांच्या पक्षप्रवेशाची अधिकृत घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे.बीड विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत हेमंत क्षीरसागर यांनी आपल्या भावांना - आमदार संदीप क्षीरसागर यांना प्रत्येक निवडणुकीत साथ दिली होती. मात्र, आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सख्खा भाऊच त्यांचा राजकीय प्रतिस्पर्धी ठरणार असल्याचे दिसत आहे.या घडामोडीमुळे बीडच्या राजकारणात नवे समीकरण तयार झाले असून, क्षीरसागर बंधूंच्या या राजकीय वळणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पान ४ वरून

## धनंजय मुंडे ची

सुपारी दिल्याचा खळबळजनक आरोप केला होता. त्यांनी यासंदर्भात काही ऑडिओ क्लिप्स देखील जाहीर केल्या. : जरांगे पाटील यांच्या या आरोपांनंतर धनंजय मुंडे यांचे समर्थक आक्रमक झाले. त्यांनी हे आरोप पूर्णपणे खोटे असल्याचे सांगत बीड जिल्ह्यातील विविध भागांत मुंडे यांच्या समर्थनार्थ आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान, मुंडे यांच्या समर्थकांनी त्यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक घातला आणि धनंजय मुंडे आगे बढो अशा घोषणा दिल्या. मुंडे समर्थकांनी जर जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांची बदनामी थांबवली नाही, तर महाराष्ट्र पेटवून देऊ, असा इशाराही दिला. या घटनेमुळे राज्यातील राजकारण तापले असून, मराठा आणि ओबीसी समाजामध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत.

## दौलावडगाव

करावा लागत आहे.ग्रामस्थांनी शासनाचे लक्ष या गंभीर समस्येकडे वेधून घेत तातडीने पूल दुरुस्ती किंवा पुनर्बांधणीसाठी निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे. ज्या पद्धतीने नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देण्यात आली, त्याच धर्तीवर या पूल पुनर्बांधणीसाठीही त्वरित निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. भरत जाधव यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीकडे निधीअभावी पूल बांधणीचे काम करता येत नाही. मात्र आम्ही सार्वजनिक बांधकाम विभाग व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवून पाठपुरावा सुरू ठेवला आहे. लवकरच सकारात्मक निर्णय मिळेल, अशी अपेक्षा आहे. तथापि, प्रशासनाने तात्काळ उपाययोजना केल्या नाहीत तर तीव्र आंदोलनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते यांनी दिला आहे. ग्रामस्थांच्या संयमाचा अंत होत असून, शासनाने तातडीने सर्वेक्षण करून पूल पुनर्बांधणीसाठी निधी मंजूर करावा, अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते पालक यांनी दिला आहे. या पूलामुळे केवळ ग्रामस्थांचा नाही तर आसपासच्या गावांचा वाहतूक आणि दळणवळणाचा प्रश्नही गंभीर झाला आहे. त्यामुळे या समस्येवर शासनाने संवेदनशीलतेने विचार करून लवकरात लवकर पूल पुनर्बांधणीची प्रक्रिया सुरू करावी, अशा मागणीचा अक्रोश दौलावडगाव ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

## व्हाईस ऑफ

उपक्रमाबद्दल आभार मानत संघटनेची ध्येय धोरणे सांगुन आता पर्यंत केलेल्या कामाची माहीती दिली.यावेळी सूत्रसंचालन विजय कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन जिल्हा कार्याध्यक्ष कैलास चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्हाईस ऑफ मिडीया जिल्हा कार्यकारीणीचे पदाधिकारी बाळासाहेब काळे,सुधीर बोर्डे, मारोती जुंबडे, राजन मंगरुळकर,सय्यद युसुफ,विष्णु सायगुंडे,शेख मुबारक, गजानन साबळे,रियाज कुरेशी,ज्ञानसाधना प्रतिष्ठानच्या फार्मसी विभाग प्रमुख सौ.अनिता अर्जुन नजन,ऑनलाईन विभाग प्रमुख प्रा.गिरीश गच्चे यांनी परिश्रम घेतले.यावेळी आनंद ढोणे,शेख अन्वर लिंबेकर,नारायण सोनटक्के,शिवाजी आकात यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार केला. या कार्यक्रमात जिल्हाभरातील पत्रकारांच्या पाल्यांना शिक्षणात मदत व्हावी यासाठी दरवर्षी शैक्षणिक किटचे वाटप केले जाते.दररोजच्या वापरातील परिपूर्ण शैक्षणिक साहित्य असलेल्या शैक्षणिक किटचे वाटप रविवारी करण्यात आले. यावेळी नऊ तालुक्यातील पत्रकारांच्या पाल्यांना किट देण्यात आल्या.

## ‘टीईटी’तील

परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ‘टीईटी’ अनिवार्य असल्याबाबत दिलेल्या निर्णयानंतर या परीक्षेचे महत्त्व वाढले आहे. तसेच, केंद्रप्रमुख भरती परीक्षेतही ‘टीईटी’ उत्तीर्ण असणे आवश्यक करण्यात आले आहे. त्यामुळे गेल्या वर्षीच्या ‘टीईटी’च्या तुलनेत यंदा ‘टीईटी’च्या नोंदणीमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. या ‘टीईटी’ला ४ लाख ७५ हजारांपेक्षा अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. २०१८ आणि २०१९ मध्ये झालेल्या ‘टीईटी’ परीक्षेत गैरप्रकार उघडकीस आले होते. त्यात अनेक उमेदवारांची संपादणूक रद्द करण्याची कारवाई करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर गेल्यावर्षीपासून राज्य परीक्षा परिषदेने गैरप्रकार रोखण्यासाठी अत्यंत काटेकोर उपाययोजना करण्यात सुरुवात केली आहे. गेल्यावर्षी केलेल्या उपाययोजनांमध्ये यंदा दोन नव्या प्रणालींची भर घालण्यात आली आहे.

## पक्षप्रवेश लांबणीवर

त्यामुळे तिकडे घाईने जाने त्यांना सोईचे वाटले नाही, तर त्यांचा विरोधक झालेल्या आ.संदीप क्षीरसागरांनी शरद पवारासोबत थांबण्याचा निर्णय घेतल्याने तो दरवाजा त्यांना बंद झाल्यासारखे वाटले असावे. पण त्या घाईत दुसरा पुतण्या डॉ.योगेश क्षीरसागर याने त्यांना विश्वासात न घेताच अजित पवारांच्या राष्ट्रवादीत एकट्यानेच जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे जयदत्त क्षीरसागरांना त्याच्या मागे फरफटत न जाण्याचा निर्णय घ्यावा लागला. दरम्यानचा काळ प्रतीक्षेचा गेला त्यात स्थानिकच्या निवडणुकाच झाल्या नाहित त्यामुळे राजकीय सामसूम झाल्याचेच चित्र निर्माण झाले होते त्यात त्यांनी काहीच निर्णय घेतला नाही. त्यांना निर्णय घेण्याची वेळ होती ती लोकसभा निवडणुकीची. भाजपला विरोध नको यासाठी भाजप श्रेष्टींचा दबाव पण भाजपचे स्थानिक नेतृत्व त्यांना विचारायलाही तयार नाही या अवस्थेत जयदत्त क्षीरसागरांचे मातेरे तर झालेच पण भाजपलाही काठावर ही जागा गमवावी लागली. भाजपचे स्थानिक नेतृत्व आणि जयदत्त क्षीरसागर या दोघांचाही अहंकार दोघांचेही नुकसान करून गेला. लोकसभा निवडणुकीत भाजप कडून पंकजाताईच उमेदवार होणार हे राजकीय जानकारांना आगोदरच समजत होते. त्यांना तुल्यबळ प्रतिस्पर्धी जयदत्त क्षीरसागर ठरु शकले असते शरद पवार साहेब अनेक दिवस चांगल्या उमेदवाराच्या शोधात होते पण जयदत्त क्षीरसागर निर्णय घ्यायला तयार नव्हते, त्यांनी तयारी केली तेंव्हा झालेला विलंब आणि दरम्यानच्या काळातले त्यांचे फडणवीस प्रेम हे त्यांना पवार साहेबांचा विश्वास मिळवायला कमी पडले आणि त्यांची संधी हुकली. लोकसभा निवडणुकीतील त्यांची काठावरची भूमिका बजरंगबप्पा सोनवणे यांच्या फायद्याची आणि पंकजाताईचे नुकसान करणारी ठरली. बजरंगबाप्पाच्या विजयातील हिस्सेदारीमुळे तरी आपल्याला पवारसाहेब विधानसभेची उमेदवारी देतील असे जयदत्त क्षीरसागरांना वाटले असेल पण संकट समयी सोबत दिल्याने त्यांनी संदीप क्षीरसागरानांच न्याय दिला. शेवटी जयदत्त क्षीरसागर यांना २०२४ची विधानसभा लढवण्याचा निर्णय घ्यावा लागला, त्यांनी त्याची पूर्ण तयारीही केली, एकाच घरातील तीन उमेदवारांची लढत होणार आणि त्यात जयदत्त क्षीरसागर जिंकणार असेच मतदारसंघाचे वातावरणही होते. पण उमेदवारी दाखल केल्यानंतरही कुटुंबातील कोणीच ऐकायला आणि समजून घ्यायला तयार नाही. हे पाहिल्यानंतर त्यांनी वयानुरूप स्वतःच शहाने होण्याचा निर्णय घेऊन ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेऊन अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार योगेश क्षीरसागर यांना पाठिंबा दिला. त्यामुळे वातावरण बदलले पण योगेश यांनाही काकांच्या पाठिंब्याचा उपयोग करून घेता आला नाही आणि काकांनाही त्या निवडणुकीत मोकळेपणाने काम करता आले नाही. परिणाम व्हायचा तोच झाला निसटता पराभव योगेशच्या पदरी पडला. जयदत्त क्षीरसागर पुन्हा कोरडे राहिले.

पान १ वरून

## प्रभाग क्रमांक २३

या भागात मोठा तरुण मित्र परिवार त्यांनी जोडलेला आहे सातत्याने लोकांची कामे परिसरातील लोकांचे प्रश्न सोडवण्यात ते परांगत असल्याने या भागात त्यांची लोकप्रियता आहे त्यांनी या भागातून निवडणूक लढवावी या साठी मित्र परिवार त्यांना आग्रह करत असून त्यांची भूमिका अद्यापही गुलदस्त्यात आहे जर समीर सरकार निवडणुकीच्या रिंगणात उतरले तर भल्या भल्याना धडकी भरवू शकतात ही परिस्तिथी आहे याचं अनुषंगाने त्यांनी निवडणूक लढवावी असा आग्रह युवा वर्गातून वाढला आहे असे झाल्यास समीर सरकार हे प्रभाग क्रमांक २३ चे गेम चेंजर ठरू शकतात अशी शक्यता नाकारता येत नाही.अनेक जण मुलाखती साठी उपस्थित राहिले अनेक जणांनी आपल्यालाच उमेदवारी मिळावी या साठी प्रयत्न केले मात्र असरार हे पूर्ण तयारीनिशी मुलाखती साठी आले होते याने अनेकांच्या भुवया उंचावल्या सोबत अनेक कार्यकर्ते आणि समर्थक असल्याने आसरार यांचे पारडे जड दिसते त्यासह त्यांची अभ्यासपूर्ण मांडणी आणि प्रभागातील मतदारांचे गणित त्यांनी अतिशय नियोजनबध्द रीत्या मांडले असल्याने त्यांची मुलाखत गाजली आहे त्यांच्या मुलाखतीचे आणि अहवालाचे खुद्द निरीक्षकांनी कौतुक केले प्रभागातील किती मते आपल्या पारड्यात आहेत पक्षाच्या माध्यमातून प्रभागात कोणती विकासाची कामे झाले व सर्व जातीय गणिते त्यांनी अतिशय नियोजनबध्द रीत्या मांडल्याने त्यांच्या उमेदवारीवर एका प्रकारे शिक्कामोर्तब झाले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

साहेब त्यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार व शिव, शाहू, फुले ,आंबेडकर, मौलाना आझाद यांचे धर्मनिरपेक्ष विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष अँड. नाझेर काझी साहेब यांनी माजी मंत्री आ.धनंजय मुंडे साहेब, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब,माजी आमदार संजय दौंड साहेब,आ.विजयसिंह पंडित साहेब, प्रदेश प्रवक्ता भागवत तावरे साहेब, बीड जिल्हाध्यक्ष अँड. राजेश्वर आबा चव्हाण साहेब,विधानसभा प्रमुख डॉ.योगेश क्षीरसागर, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते,महादेव अण्णा धांडे, अजिंक्य आनेराव,प्रज्ञाताई खोसरे,शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ चे संचालक शेख तय्यबभाई, गटनेते फारूक पटेल,नगरसेवक विनोद मुळूक,प्रा.गोपाळ धांडे, बीड यांच्या शिफारसी वरून बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे धडाडीचे कार्यकर्ते शेख निजाम यांची बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केलेली आहे नियुक्ती झाल्यानंतर शेख निजाम यांनी मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा नेटाने प्रयत्न करीन व महाराष्ट्राची संस्कृती असलेली शिव शाहू फुले आंबेडकर मौलाना आझाद यांचे धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचारांची बांधील राहून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मा. ना.अजित दादा पवार साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीन अशी ग्वाही दिली व मला अल्पसंख्यांक विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष अँड नाझेर काझी यांचे व माझ्या नावाची शिफारस करणाऱ्या सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करतो व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व पक्ष संघटन वाढवण्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थे च्या निवडणुकीत यश मिळेल या साठी प्रयत्नाची पराकाष्टा करीन अशी हमी दिली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय येथे शेख निजाम यांचा वरील मान्यवरांकडून सत्कार करण्यात आला ...

## मोहम्मद असरार

पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते मोहम्मद असरार यांची मोहम्मद असरार यांनी प्रभागाच्या अनुषंगाने खडा ना खडा माहिति पक्ष निरीक्षकांसमोर मांडली अतिशय अभ्यापूर्ण माहिती आणि कार्य अहवाल मांडत असताना प्रभागाच्या नागरिकांशी असलेली नाळ आणि विकासाच व्हिजन पाहून निरीक्षक देखील चकित झाले आहे अनेक जन उमेदवारी मागतात अनेक जण इच्छुक असतात मात्र अश्या पद्धतीने सर्वच बाजूने प्रभागाच्या दृष्टीने माहितीपूर्ण बाजू त्यांनी मांडली असल्याने एका प्रकारे त्यांच्या उमेदवारी वर शिक्का मोर्तब झाले आहे.

## आजपासून उमेदवारी

भाजप, अजितदादांची राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदेगट हे तिघेही स्वतंत्र लढण्याच्या तयारीमध्ये पहावयास मिळत आहे तर महाविकास आघाडीत राष्ट्रवादी शरद पवार गट जिल्ह्यात नेतृत्व करणार असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यास आजपासून म्हणजे १० नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे, असे असताना अद्याप भाजपासह अजितदादांच्या राष्ट्रवादीला आणि महाविकास आघाडीचे नेतृत्व करू पाहणाऱ्या शरद पवारांच्या राष्ट्रवादीला उमेदवार घोषीत करता आलेले नाहीत. गेवराई वगळता अन्य पाचही नगरपालिकांसाठी कोणाकडूनच उमेदवारांची घोषणा झालेली नाही. बीड जिल्ह्यातल्या सहा नगरपालिकांपैकी बीड नगरपालिकेचे अध्यक्षपद एस.सी. महिला प्रवर्गासाठी आरक्षीत आहे. गेवराई ओपन महिला, माजलगाव ओबीसी महिला, परळी सर्वसाधारण, धारूर सर्वसाधारण आणि अंबाजोगाई न.प. अध्यक्षपद हे सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटले आहे. स्थानिक पातळीवर महायुती आणि महाविकास आघाडी आपआपल्या उमेदवारांची अद्याप चाचपणीच करत आहे. आतापर्यंत गेवराईत भाजपने आणि अजित दादांच्या राष्ट्रवादीने उमेदवारी घोषीत केलेली आहे. तर परळी नगर परिषदेच्या अध्यक्षपदाचा उमेदवार हा मुंडे भाऊ-बहिणीचा असणार आहे. जिल्ह्यात केवळ महायुतीमध्ये परळीतच निवडणूक लढविली जाणार हे आता स्पष्ट होत आहे. या ठिकाणी महाविकास आघाडीकडून अद्याप उमेदवार देण्यात आलेला नाही, तसा मुडे भाऊ-बहिणीकडूनही उमेदवाराची घोषणा अद्याप झालेली नाही. धारूरमध्येही कुठल्याही उमेदवाराची अद्याप घोषणा झालेली नाही. तिकडे बहुचर्चीत अंबाजोगाई नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाची जागा ही सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटली आहे. या ठिकाणी तालुक्याचा कारभार हा ३५ वर्षांपासून मुंदडा कुटुंबीय हाकत आला आहे. तर शहराचा कारभार पापा मोदी गेल्या २५ वर्षांपासून हाकताना दिसून येतात. आता भाजपाच्या मुंदडा कुटुंबियांकडून नंदकिशोर मुंदडा हे निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे सांगितले जाते तर अजितदादांच्या राष्ट्रवादीकडून पापा मोदी हे. निवडणूक रिंगणात उतरणार आहेत. अद्याप या ठिकाणी उमेदवाराची घोषणा झालेली नाही. महाविकास आघाडीकडूनही उमेदवार देण्यात आलेला नाही. माजलगाव नगरपालिकेचे अध्यक्षपद हे ओबीसी महिलेसाठी सोडण्यात आलेले आहे. या ठिकाणी महायुतीत एकमत होण्याची तुसभर शक्यता दिसून येत नाही. त्यामुळे राष्ट्रवादी अजितदादा गट विरुद्ध भाजप आणि महाविकास आघाडी यांच्यात या ठिकाणी लढत होईल.ङ्गङ्गपरंतु अद्याप इथेही उमेदवारांची घोषणा झालेली नाही.

प्रचारासाठी अवघे सहा दिवस

उमेदवारी अर्ज दाखल करण्यास आजपासून सुरुवात होणार आहे. १९ ते २१ नोव्हेंबरपर्यंत नोव्हें उमेदवारी अर्ज परत घेता येणार आहेत. २५ नोव्हेंबरपर्यंत न्यायप्रविष्ट आणि क्लिष्ट उमेदवारी अर्ज वापस घेतले जातील. २ डिसेंबरला मतदान आहे. त्यामुळे केवळ उमेदवारांसाठी प्रचारासाठी सहा दिवस उरणार आहेत.

गेवराईत भाजप, अजितदादा राष्ट्रवादीच्या उमेदवाराची घोषणा

गेवराईमध्ये महायुतीतील भाजप आणि अजितदादा राष्ट्रवादी न.प. साठी आमने-सामने उभी राहिली असून जिल्ह्यात सर्वप्रथम याठिकाणी उमेदवारांची घोषणा झाली आहे. अजितदादा गटाकडून माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी शितल महेश दाभाडे यांची अध्यक्षपदासाठी उमेदवार म्हणून घोषणा केली त्यापाठोपाठ भाजपाकडून बाळराजे पवार यांच्या सौभाग्यवती गीता बाळराजे पवार यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. अद्याप महाविकास आघाडीकडून याठिकाणी कुठल्याच हालचाली पहावयास मिळत नाहीत. शिवसेना ठाकरे गटाचे माजी मंत्री बदामराव पंडित यांनी गेल्याच आठवड्यात भाजपमध्ये प्रवेश करत पवारांसोबत संधान साधले आहे. त्यामुळे इथे पंडित विरुद्ध पवार ही चूरस पहायला मिळणार आहे

## मुंढवा जमीन गैरव्यवहार

राहिलेली नाही आणि ती मुद्दामहून गुंडाळली जाण्याची शक्यता आहे, असा आरोप सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला आहे.

यासंदर्भात आता सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं आहे.या पत्रात त्यांनी असं म्हटलंय की, मुंढवा जमिनीचा बेकायदेशीर व्यवहार करण्यात आला असून शासनाच्या मालकीची जमीन खासगी व्यक्तींना देण्यासाठी अधिकाऱ्यांनी संगनमत केलेलं आहे. तसेच चौकशीसाठी नेमलेले अधिकारी सुद्धा या प्रकरणात सहभागी असल्याने या प्रकरणाची तातडीने स्वतंत्र चौकशी व गुन्हे नोंदवण्यात यावेत.

पुढे त्यांनी असंही म्हटलंय की, या संपूर्ण प्रकरणात शासनाचे काही अधिकारी आणि राजकीय नेते थेटपणे किंवा अप्रत्यक्षरित्या सामील असल्याचे स्पष्ट पुरावे आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमलेले अधिकारी हेच या गैरव्यवहारात सामील असल्याने चौकशी प्रक्रिया निष्पक्ष राहिलेली नाही आणि ती मुद्दामहून गुंडाळली जाण्याची शक्यता आहे.

या प्रकरणी, पिंपरी चिंचवडमधील बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.आरोपींमध्ये शीतल किशनचंद तेजवाणी, दिग्विजय अमरसिंह पाटील आणि रवींद्र बाळकृष्ण तारू यांची नावे असून पार्थ पवार यांचं नाव नाही.शनिवार ८ नोव्हेंबर रोजी माध्यमांशी बोलताना अजित पवार यांनी, काही गैरकृतीचे आरोप केल्यामुळे पार्थने तो करार रद्द करण्याचा निर्णय घेतला असून विक्रीपत्र रद्द करण्याचे आवश्यक दस्तऐवज नोंदणी कार्यालयात सादर केले गेले आहेत, असं सांगितलं आहे.

सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार आणि अंजली दमानिया यांनी एक्सवर या जमीन व्यवहार प्रकरणासंदर्भात अनेक प्रश्न उपस्थित करत कारवाईची मागणी केली होती.दमानिया यांनी या जमिनीची किंमत १८०४ रुपये असल्याचं म्हटलंय. तसेच त्यांनी मुद्रांक शुल्क माफ केल्याचा मुद्दा सुद्धा उपस्थित केला आहे.हा करार रद्द करताना जो खुलासा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे, त्यात ते म्हणतात की, पार्थ पवार याने तो करार रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देताना म्हटलंय की, अनियमितता आहे का, हे पडताळून पाहिलं जाईल आणि अनियमितता असेल तर नक्की कारवाई केली जाईल.याबाबत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, गेल्या काही दिवसांपासून माध्यमांमध्ये माझा मुलगा पार्थ पवार संचालक असलेल्या एका कंपनीच्या जमीन व्यवहारासंदर्भात काही बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. काल मी सांगितले होते की या प्रकरणाविषयी संपूर्ण माहिती मिळाल्यानंतरच मी याबाबत सविस्तरपणे बोलणार आहे.

त्यानुसार मी संबंधित अधिकाऱ्यांशी तसेच पार्थशी सविस्तर चर्चा करून सर्व तथ्ये जाणून घेतली आहेत.मी हे स्पष्टपणे सांगू इच्छितो की या व्यवहारात ना मी, ना माझे कार्यालय कोणत्याही टप्प्यावर सहभागी झालेले नाही. कोणताही फोन, मदत किंवा हस्तक्षेप झालेला नाही.ते पुढे म्हणाले, उपलब्ध माहितीनुसार हा फक्त जमीन खरेदीचा प्राथमिक करार आहे. पार्थ, त्याची कंपनी 'अमेडिया' किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याकडून विक्रेत्यास कोणतेही पैसे देण्यात आलेले नाहीत, तसेच जमिनीचा ताबा घेतलेला नाही. त्यामुळे हा व्यवहार अपूर्ण अवस्थेत आहे.

पार्थच्या मते, प्रस्तावित व्यवहार कायदेशीर चौकटीत आणि पूर्ण पारदर्शकतेने पार पाडला गेला होता. मात्र, सार्वजनिक जीवनात आरोपांचा संशय देखील आपल्यावर होऊ नये, हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे काही गैरकृतीचे आरोप केल्यामुळे पार्थने तो करार रद्द करण्याचा निर्णय घेतला असून विक्रीपत्र रद्द करण्याचे आवश्यक दस्तऐवज नोंदणी कार्यालयात सादर केले गेले आहेत.

या प्रकरणी, पिंपरी चिंचवडमधील बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.यातील आरोपींमध्ये शीतल किशनचंद तेजवाणी, दिग्विजय अमरसिंह पाटील आणि रवींद्र बाळकृष्ण तारू यांची नावे असून पार्थ पवार यांचं नाव नाही.आरोपींवर २०२५ भारतीय न्याय सहिंता २०२३ चे कलम ३१६(५), ३१८(२), ३(५) सह महाराष्ट्र स्टॅम्प ऍक्ट कलम ५९ प्रमाणे (भादवि कलम ४०९, ४२०, ३४) गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा पुण्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी संतोष अशोक हिंगाणे हे या प्रकरणातील फिर्यादी आहेत.

त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, 'नमूद जमीन मिळकतीचे खरेदीखत करतेवेळी रुपये ५ कोटी ८९ लाख ३१ हजार ८०० रूपये इतके मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक असल्याचे कळवले होते.तरीदेखील आरोपींनी संगणमत करून नमूद जमिनीचे खरेदी विक्री दस्त करतेवेळी शासनाला देय असलेले ०६ कोटी रुपये इतके मुद्रांक शुल्क न घेता शासनाची फसवणूक केली आहे.'या प्रकरणातील संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्याचे आदेश महाराष्ट्र राज्याचे नोंदणी उपमहानिरीक्षक उदयराज चव्हाण यांनी दिले आहेत.याआधी, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांनी स्वस्तात जमीन लाटल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार आणि अंजली दमानिया यांनी केला आहे.अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया इंटरप्राइजेस कंपनीने १८०० कोटी रुपये किंमत असलेली जमीन फक्त ३०० कोटी रुपयांमध्ये खरेदी केल्याचा आरोप केला होता. त्यानंतर, या गोष्टीची चर्चा माध्यमांमध्ये सुरू झाली.त्यानंतर, संबंधित व्यवहाराची नोंद घेत नोंदणी उपमहानिरीक्षकांनी आदेश दिले असून अनियमततेसाठी जबाबदार असलेले दुय्यम निबंधिक अधिकारी आर. बी. तारू यांना निलंबित केले आहे.

उपमहानिरीक्षकांनी आपल्या आदेशात म्हटले आहे की, आर. बी. तारु यांनी कार्यरत असताना त्यांनी नोंदविलेल्या दस्त क्र. ९०१८/२०२५ मध्ये मुद्रांक शुल्क हानी तसेच दस्त नोंदणीमध्ये अनियमतता आढळून आल्याचे दिसल्यानंतर दुय्यम निबंधक अधिकारी आर. बी. तारू यांना निलंबित करण्यात आले आहे.मुद्रांक शुल्कात सवलत घेवून ५०० रूपये, इतक्या मुद्रांकावर दस्त नोंदविला आहे. मात्र त्याप्रमाणेही १% स्थानिक संस्था कर व १% मेट्रो कर असे एकूण ६ कोटी रूपये मुद्रांक शुल्क येणे बाकी होते.संबंधित जमीन ही सरकारी मालकीची होती. त्याच्या विक्रीसाठी संबंधित अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन त्यास ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक होते पण ही गोष्ट झाली नसल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.ही जमीन महार वतनाची नव्हती, पण महार समाजातील व्यक्तींकडून विकत घेण्यात आली होती. या प्रकरणाची सखोल चौकशी होईल आणि ऋखठ नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर बीबीसी मराठीला दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणाशी आपला काहीही संबंध नसून, आपण कधीही चुकीच्या कामाचे समर्थन केले नसल्याचं अजित पवारांनी म्हटलं आहे.माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, जे काही आता माध्यमं बातम्या दाखवत आहेत त्याच्यासोबत माझा अजित पवार म्हणून काहीही संबंध नाही. मला महाराष्ट्र ३५ वर्षांपासून ओळखतो. मला चुकीच्या गोष्टी केलेल्या चालत नाही. जमिनीच्याबद्दल बातम्या सुरू आहेत. पण कोणी परवानगी दिली माहिती नाही.आपल्या नावाचा वापर करून कोणी चुकीचे करत असेल, तर मुख्यमंत्र्यांनी चौकशी करावी, असंही त्यांनी म्हटलं आहे.या आरोपावर प्रतिक्रिया घेण्यासाठी बीबीसी मराठीने पार्थ पवार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण त्यांची बाजू मिळू शकली नाही. ती आल्यावर अपडेट करण्यात येईल.अजित पवार म्हणाले, मी नातेवाईकांना फायदा होईल यासाठी अधिकाऱ्यांसाठी कधी फोन केला नाही. अधिकारी कर्मचाऱ्यांना सांगेल की माझ्या नावाचा वापर करून कोणी चुकीचे करत असेल, नियमात बसणारे काम करत नसेल तर खपवून घेणार नाही. मुख्यमंत्र्यांनी चौकशी करावी. सत्यता पडताळून बघणे आणि काय नक्की घडलं हे बघणं सरकारचे काम आहे.

पुढे ते म्हणाले, मी संपूर्ण माहिती घेऊन, नियमात बसतात या गोष्टी वस्तुस्थिती तुमच्यासमोर मांडणार आहे. स्टॅम्प ड्युटीची शहानिशा करतो. सगळ्यांनी नियमाप्रमाणे वागलं पाहिजे. तो पत्ता माझा नाही. तो बंगला पार्थ अजित पवार यांच्या नावाने आहे. मी कधीही चुकीच्या कामाचे समर्थन केले नाही. या प्रकरणात माझा काहीही संबंध नाही. मी कोणासोबत बोललो नाही. कुठल्या अधिकाऱ्याला बोललो नाही. मी संविधानाला मानणारा आहे.

सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार आणि अंजली दमानिया यांनी एक्सवर डिपार्टमेंट ऑफ रजिस्ट्रेशन अँड स्टॅम्पचा एक कागद शेअर केला असून यामध्ये मुळशी तालुक्यातील मुंढवा येथे जमिनीची खरेदीखत झाल्याचं दिसतंय.याच कागदपत्रानुसार अशोक आबाजी गायकवाड यांच्यातर्फे शितल तेजवाणी यांना पॉवर ऑफ अटर्नी दाखवण्यात आलं असून त्यांनी हे खरेदीखत करून दिलं.तसेच अमेडिया एंटरप्राइजेस एलएलपी तर्फे भागीदार दिग्विजय अमरसिंह पाटील हे खरेदीखत तयार करून घेणारे पक्षकार आहेत.

२५ मे २०२५ ला हा व्यवहार झालेला असून या जमिनीचा मोबदला ३०० कोटी रुपये या कागदावर दाखवण्यात आला आहे. त्यावर फक्त ५०० रुपये स्टॅम्प ड्युटी मुद्रांक शुल्क भरण्यात आलं आहे.या व्यवहारावर साधारण २१ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरायला हवी होती. पण ती माफ का करण्यात आली? असा सवाल विजय कुंभार यांनी उपस्थित केला आहे.पुढे ते म्हणतात, या व्यवहारात अजित पवार यांचे चिरंजीव आहेत म्हणून मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले का? सामान्य माणूस छोटंस घर घेताना लाखो रुपये मुद्रांक शुल्क भरतो. पण, कोट्यवधींच्या जमिनींसाठी यांना सवलत कशी मिळते? काही विशेष लोकांसाठी विशेष सवलत आहे का?तसेच अंजली दमानिया यांनी अमेडिया एंटरप्राईजेसचे काही कागदपत्रं पोस्ट केले असून त्यावर पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील हे दोन भागीदार असल्याचं दिसतंय.

दमानिया यांनी या जमिनीची किंमत १८०४ रुपये असल्याचं म्हटलंय. तसेच त्यांनी मुद्रांक शुल्काचा मुद्दा सुद्धा उपस्थित केला आहे.त्या म्हणतात, शेतकऱ्यांना सारखं फुकट, सारखं माफ लागतं म्हणणारे अजित पवार पोराच्या १,८०४ कोटींचे डील त्यावर १२६ कोटींची स्टॅम्प ड्युटी होते. पण, ही डील ३०० कोटी दाखवून त्यावरील २१ कोटी स्टॅम्प ड्युटीही माफ केली. ही माफी फुकट नव्हती का?तसेच ही जमीन महारवतनाची असून बॉम्बे इन्फेरिअर व्हिलेज वतन अबॉलिशन ॲक्ट १९५८ कलम ५(३) नुसार अशी जमीन सरकारच्या परवानगीशिवाय विकता, हस्तांतरीत करता किंवा गहाण ठेवता येत नाही. म्हणजे कायद्यानं वतनाची जमीन सरकारची परवानगी न घेता विकता येत नाही, जर परवानगी न घेता विक्री झाली तर ती बेकायदेशीर ठरते. अशावेळी जमीन पुन्हा सरकारकडे जाऊ शकते. यासंदर्भात महसूल मंत्री बावनकुळे जप्तीचे आदेश कधी देणार? असा सवालही दमानिया यांनी उपस्थित केला आहे. तसेच यासंदर्भात तक्रार देण्यासाठी त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची वेळ देखील मागितली आहे.

पुढे दमानियांनी ईओडब्लू (एजथ) आणि ईडीने सुद्धा या प्रकरणात चौकशी करावी अशी मागणी केली आहे.कारण, एक लाख रुपये पेड अप कॅपिटल असलेल्या कंपनीत ३०० कोटी रुपये कसे आले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.या प्रकरणात विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी सर्वांत आधी आरोप केले असून या जमिनीची किंमत १८०० कोटी रुपये असताना फक्त ३०० कोटी रुपयांत खरेदी केल्याचं त्यांनी म्हटलंय.अंबादास दानवे यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत म्हटलंय, उपमुख्यमंत्र्यांचे सुपुत्र पार्थ पवार यांची अमेडिया कंपनी अवघे १ लाख रुपये भांडवल असताना या कंपनीला १८०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेल्या जमिनीच ३०० कोटी रुपयांना खरेदी करता आली.त्यानंतर ते म्हणाले, हा झोल अजित पवार किंवा पार्थ पवारांनी महाराष्ट्राला सांगावा. त्यांनी कोरेगाव पार्क इथं आयटी पार्क आणि डेटा सेंटर उभारण्याची तयार सुरू केली आहे. ही महार वतनाची जमीन असतानाही एक लाख रुपये भांडवल असलेल्या कंपनीला हे कसं काय शक्य होतं? हे पार्थ पवारांनी समोर येऊन सांगावं.फुले, शाहू, आंबेडकरांचं नाव घेऊन महार वतनाच्या जमिनी खिशात घालायच्या हा अजितदादांचा पुरोगामी महाराष्ट्र असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेमकी काय कारवाई करणार असा प्रश्न त्यांना नागपुरात विचारण्यात आला. त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार अशा प्रकाराला पाठीशी घालतील असं वाटत नाही असं म्हणत त्यांनी अजित पवारांवर विश्वास दाखवला.

पुढे फडणवीस म्हणाले, या प्रकरणाच्या संदर्भात सगळी माहिती मागवली आहे. महसूल विभाग, लँड रेकॉर्ड, आयजीआर यासंदर्भातील सगळी माहिती मागवली आहे. चौकशीचे योग्य ते आदेश दिलेले आहेत. माहिती आणि प्राथमिक चौकशीच्या आधारावर मी हे सांगतो आहे. प्राथमिकदृष्ट्या जे मुद्दे समोर येत आहे ते गंभीर आहेत.पुढे ते म्हणाले, यासंदर्भात उपमुख्यमंत्री अशा कुठल्या प्रकाराला पाठिशी घालतील असं वाटत नाही. आमच्या सरकारमध्ये एकमत आहे. अनियमितता आहे का पडताळून पाहिलं जाईल आणि अनियमितता असेल तर नक्की कारवाई केली जाईल.

# म्हणे! 'गुन्हेगारांना जामीन, नेत्यांना जमीन' इतिहासातील सर्वात भ्रष्ट फडणवीस सरकारची ही नवी योजना!

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे आ.रोहित पवार यांची तिखट टीका

**तिन्ही पक्ष भ्रष्टाचाराने बरबटलेले असून एकमेकांना सांभाळून घेताहेत. 'करून पोट चोरी, सुरूय महाराष्ट्राची लुटमारी' अशी स्थिती !**

**मुंबई । दिव्य न्युज : – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचे कोळशालाही लाजवणारे काळे कारनामे आहेत. त्यामुळे या काळ्या कारणाम्याची श्वेतपत्रिका निघेल तेव्हा या सरकारची महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात भ्रष्ट सरकार म्हणून नोंद होईल, अशी तिखट टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सोमवारी सरकारवर निशाणा साधताना केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सर्वच पक्षांनी याप्रकरणी आपली मोर्चे बांधणी सुरू केलेली असताना विरोधक व सत्ताधाऱ्यांत आरोप प्रत्यारोपही जोरात सुरू आहेत. त्यातच अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांचा कथित भूखंड घोटाळा समोर आल्यामुळे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व पर्यायाने महायुती सरकारची चांगलीच गोची झाली आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी याप्रकरणी सरकारवर सडकून टीका करत या सरकारचे कारणामे कोळशालाही लाजवणारे असल्याचा आरोप केला आहे.**





उल्लेखनीय बाब म्हणजे रोहित पवार यांनी रविवारीच विविध घोटाळ्यांचा दाखला देत महायुती सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. ते म्हणाले होते' गुन्हेगारांना जामीन, नेत्यांना जमीन' सरकारची नवी योजना. नवी मुंबईत शिंदे साहेबांचा गट –५००० कोटीची सिडको जमीन, पुण्यात देवेंद्र फडणवीस साहेबांची भाजपा – १८०० कोटीची जैन बोर्डिंग जमीन, पुण्यात देवेंद्र फडणवीस साहेबांची भाजपा – ५०० – कोटीची मोबोज हॉटेल कंपाउंड इव्याकु प्रॉपर्टी ची जमीन, संभाजीनगर मध्ये शिंदे साहेबांचा गट एमआयडीसीची राखीव जमीन, संभाजीनगर मध्ये देवेंद्र फडणवीस यांची भाजपा २०० कोटीची अंजली टॉकीजची जमीन, पुण्यात अजित दादांचा गट ३०० कोटीची कोरेगाव पार्क जमीन, अहिल्यानगर मध्ये अजित दादांचा गट जैन समाजाची जमीन, नवी मुंबई विमानतळा जवळ अवैद्य गौण खनिज उत्खनन घोटाळा ३००० कोटी, मुंबई देवेंद्र फडणवीस साहेबांची भाजपा एसआरएच्या हजारो कोटींच्य' जमिनी, नाशिक मध्ये शिंदे साहेबांचा गट त्रंबकेश्वर जमीन, मुंबई देवेंद्र फडणवीस साहेबांची भाजपा–भाजपा कार्यालयाची जमीन हे सर्व घोटाळे बघता शिवसेना शिंदे गट, भाजप, राष्ट्रवादी अजितदादा गट या तिन्ही सत्ताधारी पक्षांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून कायदे, नियमांना धाब्यावर बसून जमिनी लाटणारी' गुन्हेगारांना जामीन, नेत्यांना जमीन' अशी नवी योजना सरकारमार्फत सुरू केलीय, असेच म्हणावे लागेल.

### वन खात्याच्या जमिनी व खानपट्टे सरकारचे आवडते खाद्य !

रोहित पवार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस सरकार घोटाळ्यांनी बरबटलेले असून यंत्रणा न्यायव्यवस्था आणि जनता यांची कोणतीही भीती या निगरगट्ट सरकारला राहिलेली नाही. कोळसा देखील लाजेल असे काळे कारणामे या सरकारचे आहेत. जेव्हा या सरकारच्या काळात कारनाम्यानची श्वेतपत्रिका निघेल तेव्हा महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात भ्रष्ट सरकार म्हणून या सरकारची नोंद होईल. परप्रांतीय दलाल आणि कंत्राटदारांना हाताशी धरून मलिदा खाल्ला जातोय. पुणे, मुंबई, नवी मुंबई आणि गडचिरोली हे या सरकारचे मलिदा खाण्याचे हॉटस्पॉट आहेत. पुण्यात सरकारी जमिनी, मुंबईत एसआरए च्या जमिनी, नवी मुंबईत वन खात्याच्या जमिनी तर गडचिरोलीत खानपट्टे हे या सरकारच्या आवडते खाद्य आहे. सुलतान मिर्झाने ज्याप्रमाणे मुंबई गुंडांमध्ये वाटली होती, त्याप्रमाणे तिन्ही पक्षांनी शहरे आणि विभाग वाटून घेतले आहेत. तिन्ही पक्ष भ्रष्टाचाराने बरबटलेले असून एकमेकांना सांभाळून घेत आहेत. हे सर्व बघता' करून पोट चोरी, सुरूय महाराष्ट्राची लुटमारी' असे म्हणावे लागेल, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

### मुख्यमंत्री सर्वच प्रकरणांची भेदभाव न करता पारदर्शकपणे चौकशी करतील का?

भाजपशी संबंधित प्रकरणे आली की, चौकशी आधीच क्लीन चीट द्यायची आणि इतर दोन मित्र पक्षांची प्रकरणे असली की पॉलिटिकल स्कोर सेटल होईपर्यंत आणि पॉलिटिकल बार्गेनिंग होईपर्यंत चौकशीचा बनाव करायचा अशा प्रकारची आपला ते कार्ट हे भाजपचे परिणामी तो बाबू आणि दुसऱ्याचे कार्यपद्धती दिसून येते. महाराष्ट्रात हे जे सर्व काही सुरू आहेत त्यासाठी सरकारचे प्रमुख म्हणून प्रामुख्याने मुख्यमंत्री जबाबदार असून आणि त्यांनी या सर्व घोटाळ्यांची जबाबदारी घ्यावी. असो मुख्यमंत्री या सर्वच प्रकरणांची कुठलाही भेदभाव न करता पारदर्शकपणे चौकशी करतील का हे बघणं महत्त्वाचं ठरेल असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# उर्दूचा अभिमान-शिक्षण आणि सेवेचा चेहरा हसीन अख्तर सर

## महाराष्ट्र उर्दू अकादमीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती; अत्तार वेल्फेअर ट्रस्टतर्फे सत्कार सोहळा उर्दू भाषेच्या प्रसार, शिक्षण व सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाचा सन्मान



बीड । दिव्य न्युज

महाराष्ट्र शासनामार्फत महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीचे अध्यक्ष म्हणून हसीन अख्तर सर यांची नियुक्ती झाल्याच्या पार्श्वभूमीवर अत्तार वेल्फेअर ट्रस्ट तर्फे त्यांचा भव्य सत्कार व गुलपुशी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम केवळ त्यांच्या नुकत्याच झालेल्या नियुक्तीचा उत्सव नसून, उर्दू भाषा, शिक्षण आणि सामाजिक सेवेत त्यांनी दिलेल्या दीर्घकालीन योगदानाची कृतज्ञता व्यक्त करणारा सोहळा होता. कार्यक्रमात वक्त्यांनी सांगितले की, हसीन अख्तर सरांनी बीड शहरात उर्दू भाषेला नवी ओळख आणि प्रतिष्ठा दिली आहे. शहरातील विविध भागांमध्ये आणि वस्त्यांमध्ये उर्दू भाषेत ठळक नावफलक व भिंतीवरील लेखन करून त्यांनी बीडच्या गल्लीबोळांना उर्दूची सुगंध दिली आहे. ही त्यांची उर्दूप्रेमाची आणि कार्यतत्परतेची जिवंत उदाहरणे आहेत. वक्त्यांनी पुढे सांगितले की, हसीन अख्तर सर युवकांना शिक्षणाकडे प्रवृत्त करतात, त्यांना उज्ज्वल भविष्य, नैतिक मूल्ये आणि सकारात्मक विचारांची दिशा देतात. ते सदैव समाजातील वाईट प्रथांविरोधात आवाज उठवतात, एकोपा आणि बंधुत्व वाढविण्याचे कार्य करतात आणि समाजसुधारणेचा संदेश देतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक तरुणांनी शिक्षण आणि सेवाभावी क्षेत्रात यश संपादन केले आहे. कार्यक्रमादरम्यान हसीन अख्तर सरांचा पुष्पगुच्छ, खैर–ए–उम्मत पुस्तक, शाल आणि पेन देऊन सत्कार करण्यात आला. वक्त्यांनी नमूद केले की, त्यांची उर्दू अकादमीच्या अध्यक्षपदी नियुक्ती ही केवळ पदवी नसून, उर्दूप्रेमी सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे. या कार्यक्रमास अत्तार वेल्फेअर ट्रस्टचे सचिव अकबर अत्तार, पत्रकार एस. एम. युसुफ साहेब, रहनुमा–ए–मिल्लतचे अध्यक्ष मौलाना तारिक अन्वर, ट्रस्टचे सदस्य परवेज अत्तार, आदिल अत्तार, सद्दाम अत्तार, अयान अत्तार, नवीद अत्तार फैजान अत्तार तसेच अनेक सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी हसीन अख्तर सरांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

समारोप प्रसंगी हसीन अख्तर सर म्हणाले –उर्दू माझी ओळख आहे, शिक्षण माझे ध्येय आहे आणि सामाजिक सेवा माझी उपासना आहे.मी वचन देतो की, उर्दू भाषेचा प्रसार, तरुणांचे शिक्षण आणि समाजकल्याणासाठी माझे सर्वस्व वाहीन.

# व्हाईस ऑफ मीडिया पाठीशी असेल तर विद्यार्थी गगणभरारी घेतील

## पोलीस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांचे प्रतिपादन व्हाईस ऑफ मीडिया कडून शैक्षणिक किटचे वाटप



परभणी/दिव्य न्युज : सालेह चाऊस

अश्या विधायक कामामुळे व्हाईस ऑफ मीडिया ही संघटना जगभरात पोहोचली असून ही संघटना विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबिरपणे उभी असेल तर हे विद्यार्थी भविष्यात नक्कीच गगणभरारी घेतल्याशिवाय राहणार नाहीत असा विश्वास परभणीचे पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी शैक्षणिक किट वाटप समारंभ प्रसंगी व्यक्त केला.

व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक किट वाटप समारंभाचे आयोजन रविवारी (दि.०९ नोव्हेंबर ) रोजी धर्मापुरी ता.परभणी येथील ज्ञानसाधना प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के हे उपस्थित होते. व्यासपीठावर ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक जिवन राजगुरु ,व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडिया, मराठवाडा कार्यकारणी उपाध्यक्ष विशाल माने, जिल्हाध्यक्ष गजानन देशमुख,परभणी तालुकाध्यक्ष संतोष मगर,शहराध्यक्ष दिवाकर माने उपस्थित होते. पुढे बोलतांना पोलीस अधीक्षक म्हणाले, महाराष्ट्रात स्थापन झालेल्या या संघटनेचे जाळे जगभर पसरले आहे, आरोग्य शिक्षण,गृहनिर्माण,व्यावसायिक दृष्टीकोन,नवतंत्रज्ञान या क्षेत्रात या संघटनेने भरीव काम सुरू केले आहे.विधायक कामामुळे ही संघटना आता नावारुपास आली असून व्हॉईस ऑफ मीडिया सारखी संघटना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभी असल्यास हे विद्यार्थी गगनभरारी घेतल्याशिवाय राहणार नाहीत असा विश्वास पोलीस अधिक्षकांनी व्यक्त करीत व्हाईस ऑफ मिडीयाने हाती घेतलेल्या शैक्षणीक कार्याचे तोंडभरुन कौतुक केले. यावेळी बोलताना प्रा.किरण सोनटक्के म्हणाले, सध्या सर्वत्र पालकांना विद्यार्थ्यांच्या मोबाईल व्यसनाची चिंता लागली आहे. मोबाईलचे व्यसन हे किती घातक आहे हे त्यांनी सांगत विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहावे असे आवाहन केले. ग्रामीण भागात राहूनही चांगले शिक्षण घेता येते, ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील कोणत्या क्षेत्रात मागे राहीले नाहीत, विद्यार्थ्यांनी आई–वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून अभ्यास करावा आणि आपले ध्येय निश्चित करावे असे आवाहन प्रा.किरण सोनटक्के यांनी केले.यावेळी विजय चोरडिया यांनी व्हाईस ऑफ मिडीयाने अल्पावधीत केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडला.प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष गजानन देशमुख यांनी संस्थापक अध्यक्ष संदिप काळे यांनी पत्रकारांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी सुरु केलेल्या

►► पान २ वर

# एमआयएमतर्फे बीड जिल्ह्यातील नगर परिषद उमेदवारांच्या मुलाखती १२ नोव्हेंबरला औरंगाबादेत–खन्ना भैय्या,शिवाजी भोसकर





बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यातील नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एमआयएम (एमआयएम) पक्षाने स्वबळावर मैदानात उतरण्याचा निर्धार केला आहे. निवडणूक जाहीर होताच इच्छुक उमेदवारांच्या उत्साहात वाढ झाली असून, नामनिर्देशन प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर खा.असदुद्दीन औवेसी साहेब, प्रदेश अध्यक्ष मा खा इम्तियाज जलील साहेब आदेशानुसार प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर यांच्या सुचनेनुसार ,मा –खचखच् बीड जिल्हा अध्यक्ष ड शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली येणाऱ्या बीड जिल्ह्यातील नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने, बीड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांना १२ नोव्हेंबर रोजी औरंगाबाद येथील दारुस सलाम यांच्या कार्यालयात सकाळी ११ वाजता मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. नगराध्यक्ष, नगरसेवक या उमेदवारांनी आपले पूर्ण बायोडाटा, ओळखपत्र आणि इतर आवश्यक कागदपत्रांसह हजर राहावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. हे आवाहन पक्षाचे नेते शिवा भोसकर आणि खन्ना मामा यांच्या वतीने करण्यात आले आहे. एमआयएमच्या या पावलामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# बीडमधील बाजार समितीच्या गाळ्यात सापडली बेवारस आलिशान कार

## गाळामालकाच्या तक्रारीनंतर कारवाई : तेल काढण्याची यंत्रे, साडया व कपडेही आढळली

### चारचाकी, मशिनरीचा मालक कोण?

या गाडीचा आणि मशिनरीचा मालक कोण? तसेच गाळा मालकाच्या परवानगीशिवाय हे सर्व साहित्य गाळ्यात का व कोणी ठेवले? या वाहनाचा एखाद्या गुन्ह्यात वापर झाला आहे का?, कारवर नंबरप्लेट नसल्याने चेसी नंबरच्या आधारे मालकाचा शोध घेतला जाणार असल्याचे पोलिस निरीक्षक अशोक मुदीराज यांनी लोकमतला सांगितल





बीड । दिव्य न्युज

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात असलेल्या एका गाळ्यामध्ये अलिशान चारचाकी आणि तेल रिफायनरीची यंत्रे आढळली आहेत. बेवारस चारचाकी व इतर साहित्य कोणी आणून टाकले, याचा शोध आता पेठ बीड पोलिस घेत आहेत. तर ही कार व साहित्य बीडमधील बंद पडलेल्या तेल फॅक्टरी मालकाचे तर नाही ना? अशी चर्चा लोक करीत आहेत.

बहिरवाडी भागात बाजार समितीमधील १०९ क्रमांकाचा गाळा महादेव देशमाने यांचा आहे. अनेक दिवसांनंतर ते त्यांचा गाळा उघडण्यासाठी गेले असता शटरच्या कुलुपास चावी लागली नाही. त्यानंतर ग्लेंडर कटरने कुलूप तोडले. शटर उघडून आत पाहिले असता त्यांना आत एक चारचाकी गाडी आणि विविध मशिनरी, यंत्रसामग्री, साड्या व कपडे दिसून आले. त्यामुळे देशमाने यांनी बाजार समिती कार्यालयात संपर्क केला. त्यानंतर त्यांनी पेठ बीड पोलिस ठाण्यात माहिती देऊन अर्ज दिला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन गाळ्याची पाहणी केली. प्राथमिक तपासात चारचाकी गाडीची किंमत सुमारे एक कोटी रुपयांच्या आसपास असल्याचे समोर आले आहे. पोलिस निरीक्षक अशोक मुदीराज, उपनिरीक्षक काकरवाल, हे. कॉ. जोगदंड, राऊत यांनी बाजार समितीमधील या गाळ्याची पाहणी करून पंचनामा केला. बेवारस वाहन व इतर साहित्य पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. निर्मनुष्य भागात हा गाळा असल्याने कार व इतर साहित्य कोणी आणून टाकले, हे शोधण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे.

# प्रभाग क्रमांक १८ मधून कैफ पटेल यांना अनील दादा जगताप यांच्या कड़े उमेदवारी द्यावी नागरिकांची मागणी

बीड । दिव्य न्युज

नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच सर्वच पक्षातील नेत्यांनी आणि पुढाऱ्यांनी कंबर कसली आहे. यातच प्रभाग क्रमांक १८ येथील समाजसेवक सर्वाच्या सुखदुः खात सहभागी होणारे आणि या प्रभगातील लोकांच्या अडीअडचणी जाणून त्याची सोडवणूक करणारे तरुण तडफदार समाजसेवक . माअनील दादा जगताप यांचे निष्ठावंत कैफ पटेल यांना तिकिट द्यावा अशी इच्छा या प्रभागातील नागरिक व्यक्त करीत आहेत.



प्रभाग क्रमांक १८ हा गत काही वर्षांत नागरी स्वरूपाने वाढलेला भाग असून, येथे पायाभूत सोयी–सुविधांबरोबरच शैक्षणिक, आरोग्य आणि वाहतूक सुविधांची मागणी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर कैफ पटेल यांनी नागरिकांच्या सहकार्याने दीर्घकालीन विकास आराखडा तयार करण्याची भूमिका घेतली आहे.मा.अनील दादा जगताप येथील नागरिकांच्या मागणीला मान देऊन कैफ पटेल यांच्या निष्टेला न्याय द्यावा एकच चर्चाला उधाण...

# पक्षप्रवेश लांबणीवर पडत असल्याने स्वतंत्र लढण्यासाठी जयदत्त क्षीरसागरांवर कार्यकर्त्यांचा दबाव



दिव्य वार्ता

**बीड । दिव्य न्युज**

**लोकसभा निवडणुकीपासून सुरु झालेली पक्ष प्रवेशाची चर्चा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लागल्यातरी संपायला तयार नाही आणि माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा पक्ष प्रवेशाचा निर्णय होत नाही त्यामुळे आता जयदत्त क्षीरसागरांनी नगर परिषदेसाठी स्वतंत्र पॅनल उभे करून सक्रिय व्हावे यासाठी कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर दबाव आणण्यास सुरुवात केल्याचे समजते. त्यामुळे जयदत्त क्षीरसागर आता नेमकी काय भूमिका घेतात याकडे लोकांचे लक्ष लागले आहे.**

**माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे एक पोक्त आणि धुरंदर राजकारणी म्हणून ओळखले जातात. पण गेल्या काही वर्षात आणि आपल्या घरातच वाद निर्माण झाल्या नंतर त्यांना अचूक राजकीय निर्णय घेता आले नाहित.**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत अपेक्षित असलेली भाजपची उमेदवारी मिळाली नाही आणि भाजप श्रेष्ठीच्या सल्यामुळे त्यांनी बीड विधानसभेची निवडणूक शिवसेने कडून लढवली आणि पुतण्या संदीप क्षीरसागराकडून त्यांना निसटता पराभव स्विकारावा लागला. त्यावेळी भाजपच्या स्थानिक नेतृत्वाने आपल्याला विरोध केला त्यामुळेच आपला पराभव झाला अशी त्यांची खात्री झाली तेथून भाजपचे स्थानिक नेतृत्व आणि त्यांच्यात कधीच राजकीय समझोता झाला नाही किंवा त्यांचा परस्परावर विश्वास राहिला नाही.

त्यानंतर घरातील वाद आणि.बंधू डॉ.भारत भूषण क्षीरसागर यांच्या आजारामुळे त्यांची राजकीय घडीच विस्कळीत झाली. त्यामध्ये पुढे शिवसेनेचे विभाजन झाले त्यात ते कोणत्या सेनेत आहेत हे कधीच स्पष्ट झाले नाही, तर भाजप नेतृत्व त्यांना सतत खेळवत राहीले. पक्ष नेतृत्वाचा पाठिंबा असूनही भाजपच्या स्थानिक नेतृत्व त्यांना कधीच स्वीकारायला तयार नव्हते. त्यानंतर राष्ट्रवादीचेही विभाजन झाले. एकत्रित राष्ट्रवादीत त्यांचा वाद हा अजितदादा पवारासोबतच असे ►► पान २ वर

## जयदत्त क्षीरसागर राजकारणात असावेत

जयदत्त क्षीरसागर राजकारणात असावेत असे वाटणारांची संख्या मोठी आहे, पण ते निर्णय घेत नाहित, धुके वाढलय, काही दिसत नाही, धूळ खाली बसू द्या, नंतर निर्णय घेऊ या त्यांच्या भूमिकेने त्यांचा घात झालाय आणि कार्यकर्ते सैरभैर झाले आहेत. जयदत्त क्षीरसागर यांचे वय झालंय, त्यांचे काय राहिलय ? त्यांनी आता शांत बसावे. असे त्यांच्या घरातल्या कोणाला वाटत असले तरी लोकांना तसे वाटत नाही असे बहुसंख्य आहेत. त्यामुळेच त्यांनी या वयातही पुन्हा क्रियाशील व्हावे असे लोकांना वाटते.

## तुळशीची लग्ने ही झाली पण यांचे काही जुळले नाही

दोन महिन्यापासून त्यांच्या राष्ट्रवादी (अजित पवार) प्रवेशाची चर्चा होत आहे, तसा दिवाळी पाडव्याच्या मुहूर्ताची चर्चाही झाली पण दिवाळी होऊन तुळशीची लमेही उरकली पण जयदत्त क्षीरसागरांचे अजून काही जुळले नाही. आतातर मुहूर्ताची चर्चाही बंद झाली आहे. त्यांच्या प्रवेशात काय अडचण आहे? कोण आडवे येत आहे ? की त्यांची स्वतःचीच काही अडचण आहे? की त्यांनीच पुन्हा आपल्या अटी व शर्ति पुढे करून स्वतःची अडचण करून घेतली आहे? हे समजायला तयार नाही.

## अहंकाराने दोघांचेही नुकसान

जयदत्त क्षीरसागरांना निर्णय घेण्याची वेळ होती ती लोकसभा निवडणुकीची. भाजपला विरोध नको यासाठी भाजप श्रेष्टींचा दबाव पण भाजपचे स्थानिक नेतृत्व त्यांना विचारायलाही तयार नाही या अवस्थेत जयदत्त क्षीरसागरांचे मातेरे तर झालेच पण भाजपलाही काठावर ही जागा गमवावी लागली. भाजपचे स्थानिक नेतृत्व आणि जयदत्त क्षीरसागर या दोघांचाही अहंकार दोघांचेही नुकसान करून गेला.


## स्वतःच शहाणे व्हावे लागले

जयदत्त क्षीरसागर यांना २०२४ ची विधानसभा लडवण्याचा निर्णय घ्यावा लागला, त्यांनी त्याची पूर्ण तयारीही केली, एकाच घरातील तीन उमेदवारांची लढत होणार आणि त्यात जयदत्त क्षीरसागर जिंकणार असेच मतदारसंघाचे वातावरणही होते. पण उमेदवारी दाखल केल्यानंतरही कुटुंबातील कोणीच ऐकायला आणि समजून घ्यायला तयार नाही. हे पाहिल्यानंतर त्यांनी वयानुरूप स्वतःच शहाने होण्याचा निर्णय घेऊन ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेऊन अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार डॉ. योगेश क्षीरसागर यांना पाठिंबा दिला. त्यामुळे वातावरण बदलले पण योगेश यांनाही काकांच्या पाठिंब्याचा उपयोग करून घेता आला नाही आणि काकांनाही त्या निवडणुकीत मोकळेपणाने काम करता आले नाही. निसटता पराभव डॉ. योगेश यांच्या पदरी पडला. जयदत्त क्षीरसागर पुन्हा कोरडे राहिले.

## लोकसभेची संधी हुकली

लोकसभा निवडणुकीत भाजपकडून पंकजाताईच उमेदवार होणार हे राजकीय जानकारांना आगोदरच समजत होते. त्यांना तुल्यबळ प्रतिस्पर्धी जयदत्त क्षीरसागर ठरु शकले असते. शरद पवार साहेब अनेक दिवस चांगल्या उमेदवाराच्या शोधात होते पण जयदत्त क्षीरसागर निर्णय घ्यायला तयार नव्हते, त्यांनी तयारी केली तेव्हा झालेला विलंब आणि दरम्यानच्या काळातले त्यांचे फडणवीस प्रेम हे त्यांना पवार साहेबांचा विश्वास मिळवायला कमी पडले आणि त्यांची संधी हुकली

# श्रीकृष्ण निवासी गुरुकुल आश्रमावर बोगसगिरीचा संशय; वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तात्काळ चौकशीची मागणी





धारूर। दिव्य न्युज :असलम शेख

धारूर तालुक्यातील आडस रोड परिसरात असलेल्या श्रीकृष्ण निवासी गुरुकुल आश्रमावर गंभीर आरोपांची चर्चा सुरू आहे. आश्रमातील प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि नोंदवलेली पटसंख्या १२० यामध्ये मोठा फरक असल्याची माहिती समोर येत आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून या आश्रमावर बोगस विद्यार्थ्यांच्या नावावर अनुदान उचलण्याचा संशय व्यक्त केला जात आहे.सदर आश्रम हा शासनमान्य निवासी गुरुकुल असून, शिक्षणासह निवास व भोजनाची सुविधा येथे असल्याचे सांगितले जाते. मात्र, वास्तव काहीसे वेगळे असल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले आहे. काही पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सांगितले की – प्रत्यक्षात आश्रमात राहणारी मुलं फार कमी आहेत, तर कागदोपत्री संख्याच वाढवून दाखवली जाते. पत्रकारांनी स्थळाला भेट दिली असता, इमारतींची दुरवस्था, अपुरी स्वच्छता व्यवस्था आणि मुलांच्या देखरेखीत हलगर्जीपणा स्पष्ट दिसून आला. काही स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सरकारी निरीक्षणासाठी अधिकारी येणार असल्याचे समजताच काही मुलांना तात्पुरते आणले जाते, पण निरीक्षण संपताच ती मुले पुन्हा दिसत नाहीत. या प्रकारामुळे आश्रमाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणाबाबत सामाजिक कार्यकर्त्यांकडून तहसील कार्यालय, धारूर मार्फत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड यांना निवेदन देण्याची तयारी सुरू आहे. या निवेदनात आश्रमाची नोंदणी, एकूण विद्यार्थीसंख्या, प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी, शासनाकडून मिळालेल्या अनुदानाची माहिती आणि मागील तीन वर्षांतील निरीक्षण अहवालाची मागणी करण्यात येणार आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी तसेच महिला व बाल विकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तात्काळ चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. बालकांच्या नावावर सरकारी निधीचा गैरवापर हा समाजासाठी कलंक आहे, असे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून लवकरात लवकर या प्रकरणाची चौकशी करून सत्य बाहेर आणावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांकडून जोर धरत आहे.

# ‘टीईटी’तील गैरप्रकार रोखण्यासाठी दोन नव्या प्रणाली

## तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उमेदवार पडताळणीची उपाययोजना

MAHA TET 2025

### प्रवेशपत्र उपलब्ध

राज्य परीक्षा परिषदेतर्फे ‘टीईटी’चे प्रवेशपत्र उमेदवारांना १० नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर या कालावधीत https://mahatet.in/ या संकेतस्थळाद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उमेदवारांनी त्यांच्या प्रवेशपत्राची मुद्रित प्रत उपलब्ध करून घ्यावी. दिलेल्या मुदतीत प्रवेशपत्र उपलब्ध करून न घेतल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेवारांची असेल, असे परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे स्पष्ट केले.

पुणे । दिव्य न्युज

शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) बोगस, डमी उमेदवारांसह कोणतेही गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य परीक्षा परिषदेकडून परीक्षेदरम्यान काटेकोर उपाययोजना केल्या जाणार आहेत. त्यात परीक्षार्थी उमेदवारांची प्रत्यक्ष तपासणीसह अद्ययावत तंत्रज्ञानाचीही जोड देण्यात आली असून, ‘फोटो व्ह्यू’ आणि ‘कनेक्ट व्ह्यू’ या दोन नव्या प्रणाली परीक्षा परिषदेने उपाययोजनांमध्ये समाविष्ट केल्या आहेत. त्यात ‘फोटो व्ह्यू’ प्रणाली उमेदवार पडताळणीसाठी, तर ‘कनेक्ट व्ह्यू’ प्रणाली वेगवान संपर्कासाठी वापरली जाणार आहे.

राज्य परीक्षा परिषदेतर्फे येत्या २३ नोव्हेंबर रोजी ‘टीईटी’ परीक्षा राज्यभरातील ►► पान २ वर

# धनंजय मुंडे ची बदनामी थांबवा : वडवणीत प्रतिमेला दुग्धभिषेक



वडवणी । दिव्य न्युज (शेख शरीफ)

वडवणी मध्ये आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेला दुग्धभिषेक घातला . बीड मधील कोणत्याही प्रकरणात आमदार धनंजय मुंडे यांची वारंवार होणारी बदनामी थांबवली जावी अशी आक्रमक भूमिका घेत मुंडे समर्थकांनी धनंजय मुंडेच्या प्रतिमेला हा दुग्धभिषेक घालण्यात आला.

मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर त्यांच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप केल्यानंतर, या आरोपांचा निषेध करत धनंजय मुंडे यांच्या समर्थकांनी त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक केला. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन धनंजय मुंडे यांनी त्यांच्या हत्येसाठी २ कोटी रुपयांची ►► पान २ वर

# दौलावडगाव केळनदीवरील पूल वाहून गेल्याने ग्रामस्थांचे हाल

## शाळकरी विद्यार्थ्यांना वळण मार्गाने प्रवासाची सक्ती; पालकांमध्ये चिंतेचे वातावरण




दौलावडगाव । दिव्य न्युज

१५ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे दौलावडगाव शेजारील केळनदीवरील पूल पूर्णपणे वाहून गेला आहे. या दुर्घटनेमुळे ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, विशेषतः शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक आणि रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

पूल वाहून गेल्यानंतर शाळकरी विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मोठा वळसा घेऊन पर्यायी मार्गाचा वापर करावा लागत आहे. या वळणमार्गावर वाहतूक प्रचंड वाढल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे पालक आपल्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत चिंतेत आहेत.दररोज नदी पार करून जाणाऱ्या मुलांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देणे अत्यावश्यक आहे, असे काही पालकांनी सांगितले.

गावातील वयोवृद्ध नागरिक आणि रुग्णांना उपचारासाठी आरोग्य विभाग व पशुवैद्यकीय दवाखान्यात पोहोचणे अत्यंत कठीण झाले आहे. बाजारतळ, शाळा, आरोग्य केंद्र तसेच स्मशानभूमी या सर्व सुविधा नदीच्या पलीकडे असल्याने ग्रामस्थांना दैनंदिन गरजांसाठीही त्रास सहन ►► पान २ वर

# नवीन वर्षाच्या प्रारंभाला वडवणी ते अहमदनगरला धावणार विजेवरील रेल्वे : सिग्नलींग कामाला गती



बीड । दिव्य न्युज

बीड ते अहमदनगर दरम्यानच्या रेल्वेचे विद्युतीकरणाचे काम पूर्ण झालेले असून रेल्वेच्या सिग्नलींगच्या कामास आणखी दोन महिन्याचा अवधी लागणार असून ते काम पूर्ण होताच विजेवर धावणाऱ्या रेल्वे बीड येथुन नवीन वर्षाच्या प्रारंभीच सुरु होण्याची खात्रीलायक माहिती कळून आली आहे. त्याच बरोबर बीडच्या पुढे परळीच्या दिशेने वडवणीपर्यंतच्या रेल्वे स्टेशनवरही सिग्नलींगचे काम चालू चालू असून असून ते ते ही। ही डिसेंबर २०२५ अखेर पावेतो पूर्ण होणार असून बीड ते वडवणी दरम्यानचे विद्युतीकरणाचे कामही लवकरच पूर्ण होणार असून नवीन वर्षात वडवणीहून रेल्वे धावण्यास सुरुवात होण्याचीही नवीन माहिती मिळाली आहे.

बीडहून अहिल्यानगरला रेल्वे सुरु होण्यास चार महिन्याचा अवधी पूर्ण होत असून एकमेव डेमु (डिझेल इंजीन असलेली) रेल्वे रविवारी साप्ताहिक सुट्टी घेऊन आठवड्यातील सहा दिवस धावत आहे. विद्युतीकरण आणि सिग्नलींग अभावी विजेवर धावणाऱ्या रेल्वे जादा संख्येने सुरु झालेल्या नाहीत. बीड ते अहिल्यानगर दरम्यानच्या रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण पूर्ण झालेले असून विजेच्या रेल्वे रुळा समोरील विजेच्या खांबावरील विजेच्या तारेमध्ये २५ किलोवॅट क्षमतेचा वीज भार सोडून त्याच चाचणी देखील झालेली आहे.

वीज भार सोडून त्याची चाचणी देखील पूर्ण झालेली आहे. अंमळनेर ते बीड दरम्यानच्या स्टेशनवर रेल्वेच्या सिग्नलींगच्या कामाअभावी विजेवर धावणाऱ्या रेल्वे सुरु करण्यात आलेल्या नाहीत. वडवणीपर्यंतच्या सर्व स्टेशनावरील सिग्नलींगची कामे दिड ते दोन महिन्यात पूर्ण होणार असून विद्युतीकरणाचे कामही या काळात पूर्ण होताच वडवणीपासून नवीन वर्षाचे प्रारंभाला रेल्वे सुरु होणार असल्याची माहिती आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०